आज़ादी का अमृत महोत्सव

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सातपूर नाशिक

## भारताचा 75 वा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

## जागतीक महिला दिन,

## भारताचा 75 वा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव महिलासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,सातपूर,नाशिक** संस्थेत आज दि. 8 मार्च 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इंडोलाईन इंडस्ट्रिज,अंबड,नाशिक या कंपनीच्या एच.आर.व्यवस्थापक श्रीमती.पुजा पाटील आणी गौरी फाउंडेशन, नाशिक च्या संचालिका श्रीमती.रोहिणी नायडु उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे प्राचार्य माननीय श्री.आर.एस. मानकर साहेब होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे श्रीमती पूजा पाटील HR मॅनेजर यांनी औद्योगिक क्षेत्रामध्ये महिलाकडुन असलेल्या अपेक्षांची सविस्तर चर्चा केली व प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. व्यासायिक क्षेत्रात यशस्वी होण्याबाबत कोणती मार्गदर्शक तत्वे अनुसरावीत याबाबत मार्ग्दर्शन केले. तसेच प्रमुख पाहुणे श्रीमती रोहिणी नायडू यांनीही संस्थेतील महिला प्रशिक्षणार्थी व महिला कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी माननीय संस्थेचे मा.उपप्राचार्य श्री. बुरकुल साहेब ,गटनिदेशक माननीय श्री. बडगुजर , माननीय श्री.बरडे तसेच संस्थेतील शिल्प निर्देशिका व महिला प्रशिक्षणार्थी संख्येने उपस्थित होत्या.

महिला दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा , वत्कृत्व स्पर्धा ,पोस्टर मेकिंग स्पर्धा ,व इतर स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या.
याप्रसंगी स्पर्धेमध्ये विजेत्या प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवराच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.
महिला दिनानिमित्त आज संस्थेतील सर्व महिला कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांच्याकरिता स्वतंत्र महिला कक्षाचे उद्घाघटन श्रीमती रोहिणी नायडू मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच दुपारच्या सत्रात संस्थेतील प्रशिक्षणार्थी व शिल्प निदेशिका यांच्यासाठी नाशिक इंजिनिअरिंग क्लस्टर अंबड नाशिक येथे औद्योगिक सुरक्षते बाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली व नाशिक इंजीनियरिंग क्लस्टर येथे उपलब्ध असलेल्या विविध औद्योगिक सुविधां बाबत माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमाकरिता 50 प्रशिक्षणार्थी व शिल्पनिदेशिका उपस्थित होत्या.










**महिला कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांच्याकरिता स्वतंत्र महिला कक्षाचे उद्घाघटन करतांना श्रीमती रोहिणी नायडू मॅडम**







**नाशिक इंजिनिअरिंग क्लस्टर , अंबड  नाशिक येथे औद्योगिक सुरक्षते बाबत कार्यशाळा व उपलब्ध औद्योगिक प्रशिक्षण सुविधां बाबत माहिती देतांनाचे छायाचित्रे**